SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 02312609091,2609135 Website : www.unishivaji.ac.inE-mail :affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation→Affiliation T2 Circulars(2) Affiliation →Affiliation T2 Information Lists
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१०२३१२६९१५३३ व ००९१०२३१६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१,२६०९१३५

Estd. 1962
"A++"
Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

जा.क्र. संलग्नता/टी-२/परिपत्रक/ No - 1224 दि. 12 JAN 2024

# परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय:- राज्यातील १०० महाविद्यालयामध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्याबाबत...
संदर्भ:- जा.क्र.मंत्री को.रोज.नावि./टिपणी/०३९/२०२४ दि.०९/०१/२०२४ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त नमुद संदर्भाकिंत विषयास अनुसरुन मा. मंत्री महोदय कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुबंई यांनी संदर्भ महाविद्यालयीन युवक-युवतींना रोजगारक्षम बनविण्यासाठी आपल्या महाविद्यालयामध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करणेकरीता पुढाकार घेणेबाबतचे पत्र आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे. त्यानुसार केवळ १०० महाविद्यालयांना कौशल्य विकास केंद्राची मान्यता देण्यात येणार आहे. या करीता मा. मंत्री महोदय कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुबंई यांच्या दिनांक ०९ जाने. २०२४ च्या सोबत जोडलेल्या पत्रामधील गुगल फॉर्म लिंक तयार करण्यात आली असून त्याव्दारे आपल्या महाविद्यालयामध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यासाठी दि.२६ जानेवारी २०२४ पर्यंत अर्ज करावयाचा आहे.

**गुगल फॉर्म ची लिंक पुढील प्रमाणे- https://kaushalya.mahaswayam.gov.in**

कळावे,
सोबत- वरीलप्रमाणे

आदेशान्वये

श्री. विलास एस. सोयम
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

जा.क्र.मंत्री को उद्या.रोज.,नावि.,/टिपणी/ /२० दि.
039/2024

मंत्री
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक : 9 JAN 2024

PVC/R/PGEST/T-2
682

प्रति,

प्राचार्य,
सर्व महाविद्यालये.

**विषय-महाविद्यालयीन युवक-युवतींना रोजगारक्षम बनविण्यासाठी आपल्या महाविद्यालयामध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करणेकरीता पुढाकार घेणेबाबत...**

भारत देशाला संबंध जगाची कोशल्य राजधानी बनविण्याचा संकल्प **मा. प्रधानमंत्री महोदय श्री. नरेंद्र मोदीजी** यांनी सन २०१४ मध्ये जाहीर केला आहे. रोजगाराबाबत बदलत्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिस्थितीत कौशल्य विकास व उद्योजकतेस अधिक प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनाने माहे जानेवारी २०१५ मध्ये स्वतंत्र कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यत्ता विभागाची स्थापना केली आहे.

युवकांना विविध क्षेत्रांमधील रोजगार उपलब्ध करुन देणे, स्वयंरोजगार करु इच्छिणा-या उमेदवारांना अर्थसहाय्य प्रदान करणे, कौशलय विकास प्रशिक्षणाच्या माध्यमातून उमेदवारांना रोजगारक्षम बनविणे ही सध्याच्या काळाची गरज पूर्ण करण्याच्या हेतूने राज्य शासनाच्या तसेच केंद्र शासनातील विविध विभागांतर्गत कोशल्य विकास प्रशिक्षणाशी निगडीत सर्व योजना व कार्यक्रमांखाली निधीची सांगड घालून एकात्मिक अंमलबजावणीद्वारे कार्यप्रवण वयोगटातील उमेदवारांची अधिक मागणी असलेल्या क्षेत्राच्या आवश्यकतेनुसार व्यावसायिक कौशल्य विकास (Skill Development), कौशल्य वर्धन (Up-skilling), पुनकौशल्य विकास (Reskilling) करण्यात येत आहे.

National Skills Qualification Framework (NSQF) अन्वये स्थापित मानकांनुसार १२०० पेक्षा अधिक व्यावसायिक अभ्यासक्रमाचे संबंधित प्रशिक्षण संस्थांमार्फत उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात येत असून सदर कौशल्य प्रशिक्षण NCF प्रणालीशी निगडीत आहे. प्रशिक्षणाअंती उमेदवारांचे मूल्यमापन Assessment) आणि प्रमाणीकरण (Certification) हे केंद्र शासनाच्या National Council for Vocational Education Training-NCVET, National Skill Development Corporation-NSDC आणि Sector Skill Councils (SSC) कडील मान्यताप्राप्त मूल्यमापन संस्था (Assessing Body) मार्फत करण्यात येते. सदर प्रमाणपत्र राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त आहे.